पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलढाणा.
स्टेट बँक ऑफ इंडिया चौक, ता. व .जि. बुलढाणा - ४४३००१
Email-sp.buldhana@mahapolice.gov.in दुरध्वनी क्र. ०७२६२-२४२१०१ फॅक्स क्र.०७२६२-२४२२४६

जा.क्र. 10193 — 13 JUL 2024

## पोलीस शिपाई व पोलीस शिपाई बॅण्डस्मन पदभरती -2022-23
## उमेदवारांसाठी सुचना

बुलढाणा जिल्हा पोलीस दलातील रिक्त असलेल्या पदनिहाय प्रमाणे पोलीस शिपाई -125 पदे व पोलीस शिपाई ( बॅण्डस्मन ) - 08 पदे अशी एकुण 133 रिक्त पदांची पदभरतीची शारीरिक चाचणी / मैदानी चाचणी दिनांक 19/06/2024 ते दि. 03/07/2024 पर्यंत घेण्यात आली आहे.

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील दिनांक 16.06.2024 रोजीचे प्रेस नोटमध्ये दिलेल्या आदेशानुसार उमेदवारांना विविध पदांकरीता (पोलीस शिपाई, चालक, बॅडस्मन, सशस्त्र पोलीस शिपाई, तुरुंग विभाग शिपाई ) एका घटकात किंवा वेगवेगळया घटकांत अर्ज करता येतात. त्यानुसार काही उमेदवारांना एका दिवशी अथवा लागोपाठचे दिवशी दोन पदांकरीता मैदानी चाचणी साठी हजर राहणेबाबत ची स्थिती निर्माण होऊन शकते व त्यामुळे काही उमेदवारांची गैरसोय होवु शकते. म्हणुन ज्या उमेदवारास एकच वेळी दोन पदांकरीता मैदानी चाचणीस हजर राहणेसाठी सुचना दिली असेल असा उमेदवार पहिल्या ठिकाणी हजर राहिल्या नंतर त्या उमेदवारांना दुसरी ठिकाणी वेगळी तारीख देण्यात यावी. दुसऱ्या ठिकाणचे घटक प्रमुखांनी अशा उमेदवारांची मैदानी चाचणी घ्यावी. तसेच मैदानी चाचणीची पहिली तारीख आणि दुसरी तारीख यामध्ये किमान 4 दिवसांचे अंतर असावे. मात्र या करीता उमेदवार पहिल्या मैदानी चाचणीस हजर होता याचे लेखी पुरावे दुसऱ्या मैदानी चाचणीवेळी सादर करावे लागतील असे आदेश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार पोलीस भरती 2022-23 मध्ये ज्या उमेदवारांनी एका पेक्षा जास्त पदांकरीता अर्ज केले आहेत आणि त्यांची मैदानी चाचणी एकाच दिवशी आली असेल अश्या उमेदवारांनी बुलढाणा जिल्हा पोलीस घटकामध्ये शारीरिक चाचणी / मैदानी चाचणी दिली नसेल तसेच ज्या उमेदवारांना या कार्यालयाकडुन वाढीव दिनांक दिली आहे अशा उमेदवारांकरीता शारीरिक मोजमाप / मैदानी चाचणीसाठी अंतिम संधी देण्यात येत असुन त्यांनी दिनांक 05.07.2024 रोजी सकाळी 05.00 वा. पोलीस कवायत मैदान, पोलीस मुख्यालय, बुलढाणा येथे कार्यालयाकडुन देण्यात आलेली वाढीव दिनांकबाबतची पोच पावती व इतर पोलीस घटकामध्ये मैदानी चाचणी केलेबाबतची उपस्थितीचा पुराव्यासह व आवश्यक शैक्षणिक इ. कागदपत्रासह उपस्थित रहावे.

शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणीकरीता दिनांक 05.07.2024 ही अंतीम तारीख देण्यात येत असुन यानंतर येणाऱ्या उमेदवारांना शारिरिक मोजमाप / मैदानी चाचणीकरीता कोणत्याही परिस्थितीत प्रवेश अथवा वाढीव दिनांक देण्यात येणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

( सुनिल कडासने )
पोलीस अधीक्षक, बुलढाणा.



Scanned with OKEN Scanner